# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.01.2026** **वार- शनिवार**

---

**सावित्रीबाई फुले जयंती**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं मुख्य प्रशासकीय इमारतीमधील सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसंच महापालिकेच्या पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक इथं 'मी सावित्री' या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आलं होतं.

**सामंत-प्रचार शुभारंभ**

केंद्रात आणि राज्यात सत्तेत एकत्र असल्याने भाजपसोबत युती करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. परंतु त्यांनी युती केली नाही. मात्र, शेवटच्या तासाभरात शिवसेनेला ताकदीचे 61 उमेदवार मिळाल्याने आता शिवसेनेला विश्वासात घेतल्याशिवाय कोणत्याच पक्षाचा महापौर होऊ शकत नाही, असा विश्वास शिवसेना नेते, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला. सामंत यांच्या उपस्थितीत आज पिंपरी इथं शिवसेना उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.

**फुले महोत्सव**

दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलला आज पुण्यात सुरुवात झाली. विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाची सांगता येत्या 5 जानेवारीला होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रासह देशविदेशातून 800 कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार सहभागी झाले असून, गझल मुशायरा, एकपात्री प्रयोग, शालेय विद्यार्थ्यांच्या नाट्यछटा, एकांकिका, सांगितिक पोवाडे, महिला सक्षमीकरणासाठी लाठीकाठी, दांडपट्टा प्रात्यक्षिक असे विविध कार्यक्रम या महोत्सवात होणार आहेत.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान**

ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी, तसेच लोकसहभागातून सक्षम प्रशासन घडविण्याच्या उद्देशानं शासनानं मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू केले आहे. या अभियानात पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी उल्लेखनीय आणि आदर्श कामगिरी करत राज्यात वेगळा ठसा उमटविला आहे.

या अभियानाच्या व्यापक प्रचार आणि प्रसिद्धीसाठी पुणे जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दौंड तालुक्यातील गलांडवाडी, बारामती तालुक्यातील काटेवाडी आणि पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी इथं उद्या विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं असल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

**मंगेशकर रुग्णालय दोषी**

गर्भवती तनिषा भिसे यांना वेळेवर वैद्यकीय उपचार आणि रुग्णवाहिकेची सुविधा न दिल्याप्रकरणी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांना पुणे धर्मादाय आयुक्त कार्यालयानं दोषी ठरवलं आहे. संयुक्त धर्मादाय आयुक्त रजनी क्षीरसागर यांनी दिलेल्या आदेशात, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालय प्रशासनानं आवश्यक वैद्यकीय उपचार देण्यात तसेच रुग्णाला वेळेत दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात कसूर केल्याचं नमूद केलं आहे. उपचारांसाठी रुग्णालयाने मागितलेली अनामत रक्कम न भरल्याने उपचारांना विलंब झाला आणि त्यातूनच भिसे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. पुणे धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षक सचिन बकाळ यांनी रुग्णालय आणि त्याच्या ११ विश्वस्तांविरोधात फौजदारी खटला दाखल केला आहे.

**रमणबाग प्रशाला ग्रंथालय**

न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेच्या 1996 च्या माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प आज खासदार मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते शाळेला हस्तांतरित करण्यात आला.

ग्रंथालयातील अनेक जुन्या पुस्तकांची पुनर्बांधणी, साहित्यिकांच्या प्रतिमा, ग्रंथालयाचे नूतनीकरण, पुस्तक देवघेव योजनेचे संगणकीकरण आदी गोष्टी या आधुनिकीकरणात करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीमध्ये ग्रंथालयांचा वाटा मोठा असून 1996 च्या माजी विद्यार्थ्यांनी केलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचं कुलकर्णी यावेळी बोलताना म्हणाल्या.

**शेतकरी अभ्यास दौरा**

राज्य सरकारकडून शेतकऱ्यांच्या परदेश अभ्यास दौऱ्यासाठी 2025-26 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या टप्प्यात सुमारे एक कोटी 20 लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासाठी राज्यातून 68 शेतकऱ्यांची निवड झाली असून हे शेतकरी युरोप, इस्राईलसह मलेशिया, व्हिएतनाम आणि फिलिपाईन्स या कृषी प्रगत देशांचा अभ्यास दौरा करणार आहे. जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा, संशोधनावर आधारित पद्धतींचा आणि व्यवस्थापन कौशल्यांचा थेट लाभ अभ्यास दौऱ्यातील शेतकऱ्यांना मिळणार असल्याची माहिती पुणे कृषी संचालक रफिक नाईकवाडी यांनी दिली.

**मतदान जनजागृती रॅली**

सायरनचा आवाज आणि लोकशाहीचा संदेश देत धावणारी अग्निशमन दलाची लाल रंगाची वाहने अशा अनोख्या पद्धतीने पिंपरी चिंचवड शहरात आज अग्निशमन विभागाची मतदान जनजागृती रॅली उत्साहात पार पडली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही रॅली शहरात विशेष लक्षवेधी ठरली.

निगडी येथील भक्ती शक्ती चौकातून सुरू झालेल्या या रॅलीत अग्निशमन विभागाच्या 14 अत्याधुनिक वाहनांसह अग्निशमन विभागाचे जवान आणि नागरिक सहभागी झाले होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**